पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा
जिल्हा विशेष शाखा, सातारा
ईमेल-pidsb.satara@mahapolice.gov.in,
संपर्क क्र.०२६२-२३४२३१
पोलीस मुख्यालय, मल्हार पेठ, सातारा- ४१५००१

# प्रेसनोट

सातारा दिनांक १६/०७/२०२५

सातारा जिल्हयातील विविध औदयोगिक क्षेत्रातील उदयोजकांच्या पोलीस विभागाशी संबंधीत असलेल्या समस्या / अडीअडचणी व त्यावर करावयाची उपाययोजना या संबंधाने श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० ते १२.४५ वाजणेचे दरम्यान अलंकार हॉल सातारा या ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीस सातारा जिल्हयातील महाराष्ट्र औदयागिक संघटना (मास) सातारा चे अध्यक्ष श्री. संजोग मोहीते, उपाध्यक्ष श्री. अनुप मुथा, सचिव, श्री. दिपक पाटील तसेच पार्ले, कमिन्स, यशराज इथेनॉल, गरवारे, बोकोलाईट फुड, पारखीप्लास्ट, क्युबील्ट व इतर ९० पेक्षा जास्त उदयोजक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये मुख्यत: उदयोजकांनी औदयोगिक परिसरामध्ये पोलीस गस्त नेमणे, पोलीस चौक्या स्थापन करणे तसेच त्यांच्या इतर अडीअडचणीबाबत मा. पोलीस अधीक्षक सो, सातारा यांना विनंती केली.

सातारा जिल्हयातील उदयोजक यांनी मांडलेल्या अडचणींबाबत पोलीस अधीक्षक सातारा यांनी योग्य मार्गदर्शन करुन मांडलेल्या समस्यांबाबत सातारा जिल्हा पोलीस दलाकडुन केल्या जाणाऱ्या उपयायोजनेबाबत चर्चा केली तसेच डायल ११२ बाबत माहीती देवुन त्याचा जास्तीत जास्त वापर करणेबाबत सांगितले.औदयोगिक परिसर हा सीसीटीव्ही कॅमेरा कक्षेमध्ये आणणेबाबत सुचना दिल्या. तसेच औदयोगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षीततेबाबत अंतर्गत सुरक्षा समिती स्थापन करावी त्यांच्याकरीता सातारा जिल्हा पोलीस दलाकडील निर्भया पथकाच्या वतीने कार्यक्रम आयोजीत करण्यात येतील असे आश्वासन दिले.सातारा जिल्हयातील सर्व ठिकाणचे उदयोग व व्यवसाय हे अधिक चांगल्यारितीने वृद्धींगत करण्यासाठी सातारा जिल्हा पोलीस दल सदैव तत्पर राहुन सर्वतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन दिले.

सदर बैठकीस श्री. तुषार दोशी, पोलीस अधीक्षक, सातारा, यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा, श्री. राजीव नवले उपविभागीय पोलीस अधीकारी, सातारा व श्री. अमोल ठाकुर उपविभागीय पोलीस अधीकारी कराड, श्री. राजेंद्र सावंत्रे पोलीस निरीक्षक, जि.वि.शा.यांनी आयोजन केले सदर बैठकीस सातारा जिल्हयातील सातारा शहर, सातारा तालुका, बोरगाव, खंडाळा,शिरवळ, वाई, लोणंद, फलटण ग्रामिण, कोरेगाव, पाटण, उंब्रज, तळबीड यांचे प्रभारी अधिकारी व अंमलदार तसेच जि.वि.शा. सातारा येथील अंमलदार उपस्थीत होते.

**पोलीस अधीक्षक सातारा करीता**

**प्रति,**

**१. जिल्हा माहिती अधिकारी, सातारा जिल्हा**
**२. सर्व संपादक / दैनिक प्रतिनिधी, सातारा जिल्हा**

Scanned with OKEN Scanner